MHAH080001452014

## निशणी क्र.२५४ वरील आदेश

वादीने प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल होवुन मिळणेसाठी सदरहु अर्ज केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ गोपीनाथ रभाजी वाघ हा दिनांक ०५.०५. २०२१ रोजी मयत झालेला आहे. मयतांचे वारस वेळेत रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा अबेट करण्यात आला आहे. सबब पारीत करण्यात आलेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करण्यात यावी अशी विनंती.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी म्हणणे देवुन आक्षेप नोंदवला. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक नाही. अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादी व प्रतिवादी हे एकाच कुंटूबातील असुन त्यांनी जाणुनबुजूत उशीर केला आहे. वैकल्पीकरित्या अर्ज मंजुर करावा असे कोर्टाचे मत झाल्यास जास्तीत जास्त कॉस्टचा हुकूम व्हावा. वादीचे अर्जास बारा महिन्यापेक्षा जास्त उशीर झाला आहे. सबब वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वाटपासाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी केला आहे. अशा दाव्याकरिता सर्व पक्षकारांचा समावेश दाव्याकामी असणे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक आहे. सबब वादीविरूध्द पारीत करण्यात अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करणे न्यायोचित होईल. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादीच्या म्हणन्याचे अवलोकन केले असता असु दिसुन येते कि, वादी व प्रतिवादी हे एकाच कुंटूबातील आहेत. वादीने अर्जास दिलेल कारण संयुक्तिक वाटत नाही. सबब सदर वादीवर रक्कम रू. १०००/- लादुन प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परिणामी खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. सदरहु अर्ज निशाणी क्र.२५४ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ गोपीनाथ रभाजी वाघ यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेण्यास झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम हा वादीने रक्कम रूपये १०००/-(अक्षरी रूपये एक हजार मात्र) तालुका विधी सेवा प्राधिकरण, संगमनेर येथे जमा करण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

Mohinee Janu Gaikwad
Digitally signed by Mohinee Janu Gaikwad
Date: 2023.08.02 10:37:17 +0000

(एम.जे.गायकवाड)
५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
संगमनेर

दिनांक ०२.०८.२०२३